Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 700 – 703
DOI: 10.5281/zenodo.10279256

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी

सहाय्यक प्राध्यापक तथा विभाग प्रमुख, इतिहास विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा ४१३६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: giridharsomwanshi@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

विसाव्या शतकातील जगातील सर्वात प्रभावी व्यक्तींमध्ये महात्मा गांधीजींचे नाव सर्वात प्रथम घेतले जाते. आजही गांधीजींच्याविचारांचा प्रभाव संपूर्ण जगा वरती मोठ्या प्रमाणात असल्याचा जाणवतो. गांधीजींनी सगितलेली सत्य, अहिंसा, सत्याग्रह, उपोषण या शस्त्राच्या बळावरती आजही शांततेच्या मार्गाने संघर्ष करण्याची व आपल्या मागण्या प्रभावीपणे मागण्याची शिकवण आजही प्रभावी ठरत आहे. महात्मा गांधीजी यांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये मांडलेले आपले विचार आजही प्रभावी असलेली दिसून येतात.

महात्मा गांधीजींनी स्वतंत्र असे शैक्षणिक विचार मांडले व स्वतंत्र शिक्षण पद्धती सुचवली. गांधीजींचे शैक्षणिक विचार आजच्या नवीन युगातही अतिशय प्रभावी असलेली आपणाला दिसून येतात. इ.स.१९०८ मध्ये हिंदू स्वराज्य या पुस्तकात गांधींनी आपले शैक्षणिक विचार मांडले त्यानंतर इ.स. १९३७ मध्ये वर्धा येथील परिषदेत हे आपले शैक्षणिक विचार सर्वांसमोर मांडले. या शैक्षणिक पद्धतीला वर्धा शिक्षण, मूलोद्योगी शिक्षण, बुनियादी शिक्षण, जीवन शिक्षण, नई-तालीम या वेगवेगळया नावांनी ओळखली जाते.

## उद्दिष्टे

१. महात्मा गांधीजी यांचे शैक्षणिक विचारची माहीत करून घेणे
२. महात्मा गांधीजींची वर्धा शिक्षण योजना समजून घेणे.

**महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार: महात्मा गांधीजींची शिक्षणाची व्याख्या**

महात्मा गांधीजींच्या मते "केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण म्हणता येणार नाही शिक्षणाची सुरुवात पण नाही तर माणसाच्या शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय".

गांधीजींनी शिक्षणाचा सर्वांगपूर्ण विचार केलेला होता. केवळ लिहिता वाचता येण्यापूर्ती 'शिक्षण' हे संज्ञा मर्यादित नाही तर मनुष्यातील अत्यूउत्तमतेचा अविष्कार  शिक्षण या संज्ञेत त्यांना अपेक्षित होता. मनुष्याच्या अंतर्गत ज्या उत्तम गोष्टी आहेत त्या उत्स्फूर्तपणे प्रकट व्हायला पाहिजेत आणि त्यासाठी मनुष्याला साक्षर करायला पाहिजे साक्षर झाल्यामुळे त्याला स्वतःला प्रकट करण्यासाठीचा मार्ग सापडेल किंवा त्याची आत्मविश्काराची क्षमता विकसित होईल या दृष्टीने त्यांनी शिक्षणाचा विचार केला होता.

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासाच्या विचारातून गांधीजींनी Three 'H' ची कल्पना मांडली.

शिक्षण: HEAD – HEART - HAND

बुध्दी – मन - शरीर

विचार – भावना - कृती

ज्ञानात्मक – भावनात्मक - क्रियात्मक

सर्वांगीण विकास

**१) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा**

मुलांना शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून दिले जावेत असा आग्रह गांधीजींचा होता. करण मातृभाषेतील शिक्षण समजण्यास सुलभ जाते. त्यामुळे सर्जनशीलता व ग्रहण शक्तीचा विकास होतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करता येतो. भाषाही संस्कृती रुजवण्याचे काम करते यामुळे स्वसंस्कृतीचा अभिमान जागृत होतो.

**२) शिक्षण मोफत व सक्तीचे**

शिक्षण मोफत असल्याने समाजातील सर्वच मुला-मुलींना शिक्षण घेण्याची सोय होईल, कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण भासणार नाही. सर्वच जाती, धर्म, पंथ ,लिंग यानुसार भेदभाव न करता सर्वांना शिक्षणाची समान संधी द्यावी असे गांधीजींचे मत होते. 7 ते 14 वयोगटातील मुला मुलींना मोफत शिक्षण दिले पाहिजे व शिक्षणाची सक्ती केली पाहिजे असे विचार गांधीजींनी मांडले.

**३) हस्तोद्योगाचे शिक्षण**

सर्व शिक्षण हे हस्तकलेच्या माध्यमातून शिकवावे. त्यामुळे मुलांच्या क्रियाशील तिला चालना मिळून शिक्षणाचा जीवनाशी संबंध जोडला जाईल या शिक्षणातून मानसिक शक्तीचा विकास घडतो तसेच या शिक्षण पद्धतीतून बालकांचा सामाजिक व नैतिक विकास घडवला जातो असे मत गांधीजींचे होते. गांधीजींनी या शिक्षणाला मुलोद्योगी शिक्षण म्हणून संबोधले होते.

**४) स्वावलंबी शिक्षण**

मुलोद्योगी शिक्षणामुळे विद्यार्थी एखाद्या वस्तू उद्योगाच्या आधारे शिक्षण घेत असल्यामुळे त्याला त्याच्या भविष्यकाळात उपजीविके करता चांगला उद्योगधंदा आत्मसात करता येऊ शकतो. तो स्वतः बनवलेल्या वस्तू उत्पादनावर व्यवसाय करू शकतो. शाळेत शिकत असतानाच वेगवेगळया वस्तू तयार करून त्या बाजारात विकल्यामुळे त्याला पैसा मिळेल व आपल्या शाळेचा खर्च भागवता येईल त्यामुळे तो आत्मनिर्भर होण्यास त्याला मदत मिळेल यासाठी गांधीजींनी मुलोद्योगी शिक्षणात स्वावलंबनाला प्रमुख स्थान दिले होते.

**५) शिक्षणात समवायाचे तत्त्व**

एखादा विषय शिकवताना तो स्वतंत्र नसून त्याचा संबंध जीवनाशी व इतर विषयाशी आहे हे पटवून देणे म्हणजे समवाय होय. समवायाचा आधार हस्तकला असल्याने स्थानिक वातावरणात अशा विषयाची निवड करावी. शाळेमध्ये शिकवल्या जाणारी सर्व विषय समवया द्वारे मुलांना शिकवली जावीत अशी अपेक्षा आहे. एका विशिष्ट उद्योगाची निवड करून तो मुलगा शिकवत असताना त्यामध्ये अन्य शालेय विषयाची ही शिक्षण मुलांना मिळेल अशी व्यवस्था मुलोद्योगी शिक्षणात करण्यातआली होती.

**६) मानसशास्त्रीय शिक्षण**

मुलोद्योगी शिक्षण योजनेमध्ये मुलांच्या स्वभाविक प्रवृत्तीचा विचार केलेला आहे त्यांच्या आवडीनुसार त्यांना शिकायला मिळावे हा विचार इथे आहे. शिक्षणाचे वातावरण उत्साही, आनंदी असावे शिक्षण लादले जाऊ नये तर मुलांनी त्याचा आनंदाने स्वीकार करावा ही मुलोद्योगी शिक्षणाची भावना आहे. मुले कृतिशील ते मुळे शिक्षण प्रक्रियेत रमतात हा मानसशास्त्रीय आधार या शिक्षण व्यवस्थेमध्ये दिलेला आहे.

**अध्ययन व अध्यापन पद्धती**

मुलोद्योगी शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी केंद्रीय शिक्षण हवे यासाठी गांधीजींनी स्वतंत्र अध्ययन अध्यापन पद्धती स्वीकारली होती. जी कृतीद्वारे शिक्षण व स्वानुभवातून शिक्षण आणि समन्वयातून शिक्षण या तत्त्वावर आधारित होती. गांधीजींच्या मते डोळे, कान, नाक, हात, पाय यांच्या माध्यमातून बालकांना शिक्षण देता येते. तसेच जास्तीत जा स्त स्वानुभावाने शिकण्याची प्रेरणा दिली पाहिजे. जीवन आणि शिक्षण याचा समन्वय असला पाहिजे.

**निष्कर्ष**

१) महात्मा गांधीजींना शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित होता

२) शिक्षण हे मातृ भाषेतून असावे व ते मोफत आणि सक्तीचे असावे अशी त्यांची धारणा होती.

३) महात्मा गांधीजींची शिक्षण योजना हस्तव्यवसायास प्राधान्य देणारी होती.

४) महात्मा गांधीजींच्या मुलोद्योगीशिक्षणामध्ये स्वावलंबन आणि समवायाचे तत्त्व होती.

**संदर्भ सूची**


१. घोरमोडे के.यु., घोरमोडे के.के., शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

२. अहेर हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९५

३. पाटील महेंद्र, भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१९

४. पवार ना.ग., शिक्षणक्षेत्रातील विचारवंत, नूतन प्रकाशन, पुणे, २००४

५. ग्रोवर बी. एल., बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली, २०१३